# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला प्राणवायू निर्मिती प्रकल्प सुरु करण्याचे कंत्राट दिल्याबाबत

**(१) १०४३९ (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ रुग्णालयांमध्ये १६ प्राणवायू निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला ८४ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले परंतु दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे या कंपनीवर नोटीस बजावून महानगरपालिका प्रशासनाने दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सदर मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला पुन्हा ११ जम्बो कोरोना उपचार केंद्रात प्राणवायू निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी एकूण ६७ कोटी रुपयांचे काम देण्याची शिफारस केल्याची बाब दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीला नोटीस बजावून कारवाई करण्याचा इशारा दिला असतानाही पुन्हा त्याच कंपनीला उक्त प्रकल्पाचे काम देण्याची तसेच सदर कंपनीवर महानगरपालिकेकडून अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार सदर मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीचे कंत्राट रद्द करुन त्यांच्यावर मुदतीत काम पूर्ण न केल्याने शासन दंडात्मक कारवाई करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ रुग्णालयांमध्ये १६ प्राणवायू निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम मेसर्स हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला रुपये ८३.८३ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले होते. सदर कंत्राटामध्ये प्राणवायू निर्मिती संचाचे एक वर्षाकरीता प्रचालन व पाच वर्षांकरीता सर्वसमावेशक सेवा व परिरक्षणाचे काम अंतर्भूत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेमध्ये मोठ्या प्रमाणात प्राणवायुची आवश्यकता भासल्यामुळे मुंबईतील जम्बो कोरोना केंद्रामध्ये दुसऱ्या टप्प्यात ऑक्सिजन निर्मिती संयंत्रे प्रस्थापित करण्याबाबतचा निर्णय

घेण्यात आला. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त निविदेस अनुसरुन मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला ४ जम्बो कोरोना उपचार केंद्रांमध्ये प्राणवायु निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी रुपये ६६.८४ कोटी एवढ्या किंमतीचे कंत्राट देण्यात आले. सदर कंत्राटामध्ये प्राणवायु निर्मिती संचाचे तीन वर्षांकरीता प्रचालन व तीन वर्षांकरीता सर्वसमावेशक सेवा व परिरक्षणाची कामे अंतर्भूत आहेत.

तथापि, सद्य:स्थितीतील आवश्यकतेनुसार तीन जम्बो कोरोना उपचार केंद्रांमध्ये प्राणवायु निर्मिती संचाचे कार्यादेश देऊन उभारणीचे काम मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत पूर्ण करण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) मुंबईतील जम्बो कोरोना केंद्रामध्ये दुसऱ्या टप्प्यात ऑक्सिजन निर्मिती संयंत्रणे प्रस्थापित करण्याच्या कामाच्या निविदेस दोन वेळा मुदतवाढ देऊनही नियत दिनी केवळ दोन प्रतिसादात्मक निविदा प्राप्त झाल्या. परंतु मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला दुसऱ्या निविदेमध्ये सहभाग करण्याबाबत अटकाव करण्यात आलेला नाही, मात्र त्या कंपनीच्या कामाची व्याप्ती कमी करण्यात आलेली आहे.

त्यामुळे मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला केवळ ४ जम्बो कोरोना उपचार केंद्रांमध्ये प्राणवायु निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी कंत्राट देण्यात आले होते.

तसेच, सदर प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, उशिरा काम पूर्ण केल्याबद्दल मे. हायवे कन्स्ट्रक्शन कंपनीला निविदेच्या अटी व शर्तींनुसार रुपये ३.०६ कोटी इतका दंड आकारण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भंगारातील जलवाहिन्यांच्या विक्रीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२) १०४७३ (०६-१२-२०२१) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने २७०० मि.मी. व्यासाच्या ब्रिटीशकालीन जलवाहिन्या भंगारात काढल्या असून १० हजार मेट्रीक टन वजनाच्या जलवाहिन्यांच्या विक्रीतून महानगरपालिकेला ३२ कोटी रुपये मिळाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत नियमानूसार निविदा काढण्यात आल्या नसून, या जुन्या जलवाहिन्यांची विक्री परस्पर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्याचा भंगार सामानाचा बाजार भाव ४८ रुपये किलो असतानाही सन २०२० नूसार ही विक्री ३२ रुपये किलोने करण्यात आल्याने महानगरपालिकेला १५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार विना निविदा अशा प्रकारची विक्री करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-१०-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने १८०० मि.मी. व्यासाच्या १०,०१८ मेट्रीक टन वजनाच्या ब्रिटीशकालीन जलवाहिन्या भंगारात काढल्या असून, सदर भंगारमालाच्या रुपये ३२.२६ कोटी इतक्या रकमेने विक्री करण्याचे काम द्वैवार्षिक करारान्वये नियुक्त कंत्राटदारामार्फत करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेची रुग्णालये, प्रसुतीगृहे, दवाखाने, विभाग कार्यालये व विविध खाती येथील १६ विविध प्रकारच्या भंगारमालाची विल्हेवाट लावण्याकरीता ई-निविदा मागवून माहे डिसेंबर, २०२० ते डिसेंबर, २०२२ अशा कालावधीकरीता स्थायी समितीच्या मंजुरीनुसार कंत्राटदाराची नियुक्ती करुन सदर कामासाठी द्वैवार्षिक करार करण्यात आला.

सदर निविदा/कंत्राटांतर्गत या दोन वर्षांच्या कालावधीत महानगरपालिकेने गृहीत धरलेल्या अंदाजित वजनाच्या भंगारमालाची तसेच त्या कालावधीत निर्माण होऊ शकणाऱ्या अतिरिक्त वजनाच्या भंगारमालाची विल्हेवाट करण्याची तरतूद असल्याने सदर निविदा/कंत्राटान्वये, जलवाहिनीच्या प्रकारासाठी (एम.एस. धातूसाठी) नियुक्त कंत्राटदारास जलवाहिन्या भंगारात काढण्याचे काम स्थायी समितीची मंजुरी घेऊन देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे नाही.

सन २०२० च्या ई-निविदा प्रक्रियेनुसार ११ प्रतिसादात्मक निविदाकारांकडून प्राप्त झालेल्या स्पर्धात्मक दरांमधून उच्चतम दरानुसार १६ विविध प्रकारच्या भंगारमालासाठी दर निश्चित करण्यात आले व त्यानुसार द्वैवार्षिक करार करण्यात आला.

सबब निश्चित केलेले दर दोन वर्षांच्या कंत्राट कालावधीसाठी स्थिर असल्याने संबंधित कंत्राटदाराला रुपये ३२.२१ प्रति कि.ग्रॅ. इतक्या दराने विल्हेवाट लावण्याचे काम देण्यात आले असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, मे. गरीब नवाज कॉर्पोरेशन व मे. नवाब कॉर्पोरेशन या कंपन्यांनी सदर प्रकरणी महानगरपालिकेविरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका व त्याअनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात केलेले याचिका/अपील मा.न्यायालयांनी फेटाळले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील ब्रिटिशकालीन लोखंडी पूल व अजनी पूल जीर्ण झाल्याबाबत

**(३) १०७१२ (०५-०१-२०२२) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर व जिल्ह्यात अंदाजे शंभर वर्ष जुने ब्रिटिशकालीन पूल असून त्यापैकी लोखंडी पूल व अजनी पूल अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्यामुळे प्रवासासाठी अत्यंत धोकादायक बनले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर सर्व जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जुने व जीर्ण

पुलांबाबत शासनाने प्रभावी योजना आखून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०२-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे,

नागपूर शहरात लोखंडी आर.यु.बी. (Rail Under Bridge) व अजनी आर.ओ.बी. (Rail Over Bridge), नाग ब्रिज आर.यु.बी., मोमिनपुरा आर.यु.बी., जरीपटका आर.ओ.बी. ब्रिटीशकालीन पूल असून त्यापैकी लोखंडी आर.यु.बी. व अजनी आर.ओ.बी. हे जीर्ण अवस्थेत आहे. सदर सर्व जुन्या पुलांचे मध्ये रेल्वेद्वारे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. जुन्या पुलांच्या सुरक्षेसंदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत सन २००८ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना कुटुंबीय निवृत्ती वेतनाचा लाभ मिळण्याबाबत

**(४) ११९१० (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत दिनांक ५ मे, २००८ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी जुनी निवृत्तीवेतन योजना बंद करुन नवी योजना लागू करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या निवृत्तीवेतन योजनेचे प्रारुप बृहन्मुंबई महानगरपालिकेने अद्यापपर्यंत निश्चित केले नसल्याने महापालिकेच्या सेवेत सन २००८ नंतर रुजू झालेल्या सुमारे ४५० कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय निवृत्ती वेतनाच्या लाभापासून सद्य:स्थितीत वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि तदनुषंगाने महानगरपालिकेच्या सेवेत सन २००८ नंतर रुजू झालेल्या सुमारे ४५० कर्मचाऱ्यांना कुटुंबीय निवृत्ती वेतनाचा लाभ अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राज्य शासनाने दिनांक २७/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट केलेली आहे.
सद्य:स्थितीत नवीन परिभाषित निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्याचा मृत्यू अथवा सेवात्याग प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्याच्या नवीन परिभाषित निवृत्तीवेतन योजनेच्या खाती जमा असलेल्या रकमेमधून आस्थापना, बॅक/सोसायटी वसुली वळती करुन उर्वरित संपूर्ण रक्कम कर्मचाऱ्यास/कायदेशीर वारसास प्रचलित पध्दतीने अधिदानित केली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील इमारतीत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याबाबत

**(५) १२८८७ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८१ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे ४ हजार इमारतीत अग्निशमन यंत्रणा कार्यरत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ मध्ये इमारतीच्या केलेल्या सर्व्हेक्षणात ३,७९७ इमारतींपैकी ३,०८७ इमारतीत अग्निशमन यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दर सहा वर्षानंतर इमारतींचे ऑडिट करणे बंधनकारक असतानाही अनेक सोसायट्या याकडे दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इमारतींचे ऑडिट न करता इमारतीत अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत माहे ऑगस्ट, २०१८ ते एप्रिल, २०२२ पर्यंत एकूण २६७२ इमारतींची तपासणी करण्यात आली, त्यापैकी एकूण ७५१ इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सन २०१९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत एकूण ९३५ इमारतींची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २९० इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती.

(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३(३) नुसार इमारतींचे मालक/भोगवटादार यांनी इमारतीमधील अग्निप्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतची माहिती प्रपत्र "ब" द्वारे लायसन्सप्राप्त अभिकरणमार्फत अग्निशमन दलास माहे जानेवारी व जुलै महिन्यात असे वर्षातून दोन वेळा सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर कार्यवाही सोसायट्यांमार्फत वेळोवेळी होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत तपासणीदरम्यान इमारतींमध्ये बसविलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आल्यास व अग्निप्रतिबंधक यंत्रणेमध्ये त्रुटी आढळल्यास सदर इमारतीच्या मालक/भोगवटादार यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम-२००६ नुसार विहित मुदतीत त्रुटींची पूर्तता करण्यासाठी नोटीस बजावण्यात येते.

सन २०१९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत एकूण ९३५ इमारतींची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २९० इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती.

सदर त्रुटींचे विहित कालावधीमध्ये अनुपालन न केल्यामुळे ३ इमारतींवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३६ नुसार शिक्षा व दंडात्मक कारवाईची

प्रक्रिया करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फैजपूर (जि.जळगाव) नगरपालिका विस्तारित विभागात नागरी सुविधेकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) १८२०२ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फैजपूर (जि.जळगाव) नगरपालिका विस्तारित विभागात नागरी सुविधा निधी अभावी रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फैजपूर नगरपालिका विस्तारित विभागात नागरी सुविधा देण्याकरीता निधीची तरतूद करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०१-२०२५) :** (१), (२), व (३) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.८१/नवि-१६, दिनांक १३ मार्च, २०२३ अन्वये रुपये १.७० कोटी निधी व शासन निर्णय क्रमांक नपावै-२०२३/प्र.क्र.३२७(२३-१)/नवि-१६, दिनांक २७ जुलै, २०२३ अन्वये रुपये २.५० कोटी निधी असे एकूण रुपये ४.२० कोटी निधीचे आदेश वैशिष्टपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत (४२१७ ०६०३) फैजपूर नगरपरिषदेस मंजूर करण्यात आले आहेत.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

## वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीतील विकास आराखड्यात शाळांसाठी राखीव असलेल्या भूखंडावर स्वत:च्या शाळा उभारण्याबाबत

**(७) २१०३८ (१७-१२-२०२३) श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १९५४४ ला दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांशी महानगरपालिका हद्दीत महानगरपालिकेच्या शाळा असतानाही गत १३ वर्षांत वसई-विरार महानगरपालिका स्वतःच्या शाळा सुरू करू शकली नसल्याची बाब दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई – विरार विकास आराखड्यात शाळांसाठी ६९ भूखंड राखीव असून वसई-विरारमध्ये सद्य:स्थितीत खासगी शाळांमधून शुल्काच्या माध्यमातून पालकांची मोठ्या प्रमाणात लूट होत असून त्याकरीता शाळांसाठी राखीव असलेल्या भूखंडावर वसई-विरार महानगरपालिकेच्या शाळा उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०१-२०२५) :** (१) व (२) वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये शिक्षण मंडळ अस्तित्वात नाही. तसेच याबाबत महानगरपालिकेचे धोरण अद्याप निश्चित करण्यात आलेले नसल्याने महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळा अस्तित्वात नाही, ही वस्तुस्थिती आहे.

वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी एकूण १५३ भूखंड आरक्षित असून महानगरपालिकेचे शैक्षणिक धोरण निश्चित झाल्यावर शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन शाळा उभारणी व इतर अनुषंगिक शैक्षणिक कामे करण्याबाबतची कार्यवाही करण्याची तजवीज महानगरपालिका स्तरावर ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्न महाविद्यालयांचे ग्रंथपाल व संचालक शारीरिक शिक्षण पदास शिक्षक संवर्गात समाविष्ट करणेबाबत

**(८) २१३१६ (०५-०१-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्न महाविद्यालयांचे ग्रंथपाल व संचालक शारीरिक शिक्षण पदास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियमानुसार 'शिक्षक' संवर्गात समाविष्ट करण्याबाबतची सातत्याची मागणी ग्रंथपाल व क्रीडा शिक्षकांकडून होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार राज्यातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक संलग्न महाविद्यालयांचे ग्रंथपाल व संचालक शारीरिक शिक्षण पदास 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम २ (३५)च्या कलमांतर्गत 'शिक्षक' संवर्गात समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ग्रंथपाल व संचालक, शारीरिक शिक्षण या पदांना शिक्षक संवर्गांतर्गत समाविष्ट करण्याविषयी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक मार्फत भारतीय चिकित्सा पध्दती, राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिनांक १८/१०/२०२३ च्या पत्रान्वये "Commission discussed the matter and unanimously decided that not to consider the representation of Health Science Colleges Library & Sport Teachers Association in respect of Inclusion of Librarian & Director of Physical Education as "Teachers" working in affiliated colleges of Maharashtra University of Health Sciences, Nashik, Maharashtra." असे अभिप्राय दिले होते. सदर बाब कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या दिनांक १७/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये राजभवन सचिवालयास कळविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला शहरातील सांस्कृतिक भवनकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) २१४५८ (०३-०१-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील विविध माध्यमातील उद्योन्मुख कलाकारांना प्रोत्साहन देण्याकरीता या शहरामध्ये सुसज्ज अशा सांस्कृतिक भवनाच्या मागील ४० वर्षापासून होत असलेल्या मागणीच्या अनुषगाने शासनाने अकोल्यातील दिवेकर संकुलामध्ये सुसज्ज अशा सांस्कृतिक भवनाकरीता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता परंतु सन २०१४ नंतर निधीअभावी सदर सांस्कृतिक भवनाचे (नाट्यगृहाचे) काम प्रलंबित असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सांस्कृतिक भवनाचे काम पूर्णत्वास येण्याकरीता व त्याच्या भव्यतेमध्ये वाढ करण्याकरीता शासन येत्या अर्थसंकल्पामध्ये या सांस्कृतिक भवनाकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०१-२०२५) :** (१), (२), व (३) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ (ले.शि.२२१७ ०९१३) अन्वये रुपये १५.०० कोटी व शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२४/प्र.क्र.४० (२२)/नवि-१६, दिनांक ०१ मार्च, २०२४ (ले.शि.४२१७ ०५४१) अन्वये रुपये १५.०० कोटी असा एकूण रुपये ३०.०० कोटी निधी महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई सुविधांचा विकास योजनेंतर्गत अकोला महानगरपालिकेस सांस्कृतिक भवन उभारणे या कामाकरीता मंजूर करण्यात आला आहे.

---

## हिंगणघाट (ता.हिंगणघाट,जि.वर्धा) येथे शासकीय महाविद्यालय सुरू करण्याठी लोकप्रतिनिधी आणि अनेक स्थानिक संघटनांनी आंदोलन केल्याबाबत

**(१०) २१६०८ (१९-०४-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट येथे (ता.हिंगणघाट,जि.वर्धा) शासकीय महाविद्यालय सुरू करण्यात यावे या मागणीसाठी मागील तीन महिन्यांपासून लोकप्रतिनिधी आणि अनेक स्थानिक संघटनांनी व स्थानिक नागरिकांनी शहरात विविध आघाड्यावर जन आंदोलने आणि क्रांती मशाल मोर्चे काढल्याची बाब माहे ऑगस्ट,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीनुसार हिंगणघाट येथे शासकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी शासन निर्णय दिनांक ५/०२/२०२४ अन्वये

हिंगणघाट ही जागा निश्चित करण्यात आली होती. तथापि, सदर ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक जागा अनुपलब्ध असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक १२/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वर्धा जिल्ह्यातील "हिंगणघाट" या जागेऐवजी कृषी विभागाच्या अखत्यारीतील "मौजे जांब, ता.समुद्रपुर, जि.वर्धा" येथील भूमापन क्र. ३२० मधील खाते क्र. २२२ ही जागा निश्चित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपली चिकित्सा योजनेंतर्गत रुग्ण चाचणी अहवाल मिळण्यास विलंब होत असल्याबाबत

**(११) २१६६३ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपली चिकित्सा योजनेंतर्गत रुग्णांच्या चाचणीचा अहवाल २४ तासात डॉक्टरांना मिळणे अपेक्षित असताना तपासणी अहवालासाठी जवळपास तीन ते चार दिवसांचा कालावधी लागत असून, काही रुग्णांना वेळेत अहवाल मिळत नसल्याने वैद्यकीय निदान व उपचार करण्यास विलंब होत असल्याची बाब दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपली चिकित्सा योजनेतून मिळणारे तपासणी अहवाल वेळेत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२४) :** (१) 'आपली चिकित्सा' या योजनेंतर्गत रुग्णाच्या रक्ताच्या तपासणीनंतर बेसिक चाचण्यांचा तपासणी अहवाल २४ तासांमध्ये ई-मेलद्वारे रुग्णांना कळविला जातो. तसेच एडव्हान्स चाचण्यांचा अहवाल येण्यास २४ तासांपेक्षा अधिक कालावधी लागतो. त्यानुसार अहवालाची प्रत २ ते ३ दिवसांत उपलब्ध करुन दिली जाते. रुग्णाने ई-मेलवरील सॉफ्ट कॉपी संबंधित डॉक्टरांना दाखविल्यास तात्काळ उपचारांना सुरुवात करण्यात येते.
(२) सदर प्रकरणी कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या होत्या. तसेच कंत्राटदाराबरोबर वेळोवेळी बैठका घेऊन सदर रक्त चाचण्यांचे अहवाल त्वरित उपलब्ध करुन देण्याकरीता निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर कंत्राटदाराने सदर सेवा डॅश बोर्डवर व रुग्णाच्या व्हॉटस ॲपवर ॲड डाऊनलोड करुन रक्त चाचणीचा अहवाल त्वरीत मिळण्याची सुविधा सुरु केल्यामुळे सध्या रक्त चाचणीचे अहवाल विहित वेळेत डॉक्टरांना उपलब्ध होत आहेत. त्यानुसार रुग्णांच्या आजाराचे निदान व वैद्यकीय उपचार करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## द्राक्ष बागांना प्लास्टिक कव्हरखाली आणाव्या या तंत्रासाठी ५० टक्के अनुदान देण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत

**(१२) २१७४७ (०३-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची द्राक्ष शेती साडेचार लाख एकर पेक्षा अधिक जमिनीवर होत असून नैसर्गिक आपत्तीत द्राक्ष बागांचे अतोनात नुकसान होत असल्याने द्राक्ष बागांना यापुढे प्लास्टिक कव्हरखाली आणण्याच्या तंत्रासाठी ५० टक्के अनुदान देण्याकरिता शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी द्राक्ष बागायतदार संघाने शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, द्राक्ष बागायतदार संघाने केलेल्या सर्व मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. भरत गोगावले (०३-०२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर तंत्रज्ञान हा घटक ५० टक्के अनुदान तत्वावर प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार येथील अनधिकृत इमारतींमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे घर खरेदीदारांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१३) २१८२७ (०५-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार मध्ये बनावट कागदपत्रे, बनावट शिक्के यांच्या आधारे ५५ अनधिकृत इमारतींचा शोध महानगरपालिका आणि पोलीस यंत्रणेकडून घेण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका, जिल्हाधिकारी, सिडकोपासून दुय्यम निबंधक कार्यालयांचे बनावट शिक्के, लेटरहेड, करारनामे वापरून कागदपत्रे बनविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून या प्रकरणी वसई विरार मधील विविध पोलीस ठाण्यात एकूण ८ गुन्हे दाखल झाले असून या आठ गुन्ह्यामध्ये ३३ इमारतींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई - विरारमध्ये बोगस कागदपत्रे व शिक्क्यांच्या आधारे ५५ अनधिकृत इमारती उभारण्याचे प्रकरण वाढले असून यामध्ये बोगस सी. सी. आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करून घरे विक्री केल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच उर्वरित इमारतींचा शोध घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०२-२०२५) :** (१), (२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिका व पोलीस यंत्रणा यांच्या संयुक्त कार्यवाहीमध्ये दुय्यम निबंधक, सिडको व नगर रचना कार्यालयाचे बनावट शिक्के, लेटर हेडचा वापर करुन अनधिकृत इमारती बांधल्याबाबतची बाब निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरणी वसई विरार शहर महानगरपालिका परिक्षेत्रातील पोलीस ठाण्यांमध्ये महानगरपालिकेमार्फत संबंधित अनधिकृत बांधकाम व्यवसायीकांविरुध्द ३८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे उक्त अनधिकृत बांधकाम व्यवसायीकांविरुध्द फौजदारी कायदा कलम भा.द.वि.स. कलम व एम.आर.टी.पी. कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस विभागामार्फत कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सदनिका खरेदी व विक्री करताना सामान्य नागरीकांची फसवणूक होऊ नये म्हणुन बांधकाम व्यावसायिकांना देण्यात येणाऱ्या परवानग्या (सी.सी. व ओ.सी.) या महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. वसई, विरार क्षेत्रातील दुय्यम निबंधक कार्यालयांना सदनिकांची दस्त नोंदणी करताना दस्ताच्या वैधतेची खातरजमा करुनच दस्त नोंदणी करण्याबाबत लेखी कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका स्तरावर आवश्यक त्या उपाययोजना करीत असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील पदभरती बाबत

**(१४) २२९७६ (२०-०७-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१९९४ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ जिल्हा परिषदेच्या १३,५२१ जागांसाठी भरती करण्यासंदर्भात सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर भरती प्रक्रिया सन २०२३ मध्ये वा त्यासुमारास रद्द करण्यात आल्याचे माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषदांमधील ‘क’ वर्गातील १९,४६० पदे सरळसेवेने भरती करण्यासंदर्भात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीतील काही पदांच्या घेण्यात आलेल्या परीक्षाचे निकाल माहे जानेवारी २०२४ मध्ये घोषित झाले असून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना अद्याप नियुक्ती मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, जिल्हा परिषद भरती प्रक्रिया मागील पाच वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे वेळ,पैसा वाया जाऊन शासकीय नोकरीची वयोमर्यादा उलटून गेल्याने तसेच या दोन्ही परिक्षांसाठी हजारो विद्यार्थ्यांनी अर्ज व परीक्षा शूल्क भरुनही काही पदांची परीक्षा घेण्यात न आल्यामुळे व ज्यां पदांची परीक्षा झाली त्या उमेदवारांना नियुक्ती पत्र न दिल्यामुळे बेरोजगारांत असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, यासंदर्भात सदरहू परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना तातडीने नियुक्ती देण्याबाबत तसेच प्रलंबित नोकरभरती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत

**श्री.जयकुमार गोरे (२०-०२-२०२५) :** (१) होय, सन २०१९ व सन २०२१ मधील जिल्हा परिषद पदभरती प्रक्रिया ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२२ अन्वये रद्द करण्यात आली आहे.
(२) नाही. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांतर्गत गट-क मधील एकूण ३० संवर्गातील १९,४६० रिक्त पदांची भरती प्रक्रिया दिनांक ०५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीनुसार सुरू करण्यात येऊन सदर परीक्षा प्रक्रिया पार पडली आहे. माहे जानेवारी, २०२४ मध्ये घोषित झालेल्या निकालांनुसार पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही. सन २०१९ मध्ये परीक्षा न झाल्याने वयाधिक्यामुळे अपात्र ठरत असलेल्या उमेदवारांना शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२२ नुसार वयात सुट देण्यात येऊन पुढील फक्त एक परिक्षेकरीता बसण्याची संधी देण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०५ ऑगस्ट, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन सर्व संवर्गांच्या परीक्षा पार पडल्या आहेत. काही प्रकरणी न्यायालयीन याचिका दाखल होऊन अंतिम न्याय निर्णयानुसार नियुक्ती करणेबाबत आदेश प्राप्त झाल्याने सदर पदे वगळता इतर ठिकाणी पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात विद्यार्थ्यासोबत रॅगिंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१५) २३७०८ (२०-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरातील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासोबत रॅगिंग करुन धारदार चाकुने विद्यार्थ्याला गंभीर जखमी केल्याची घटना दिनांक ७ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०५-०३-२०२५) : (१)** व (२) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव या महाविद्यालयाच्या परिसराबाहेर दोन विद्यार्थ्यांमध्ये मारहाण झाल्याची घटना दिनांक ०७/०४/२०२४ रोजी महाविद्यालयाचे निदर्शनास आली आहे. प्रकरणी महाविद्यालयाने नियुक्ती केलेल्या समितीमार्फत चौकशी करण्यात आली. चौकशीअंती वादी व प्रतिवादी या दोघामधील मारहाण ही रॅगिंग प्रकारातून झालेली नसून

वैयक्तिक वादातून झाली असल्याचे निष्पन्न झाले व तक्रारदाराने तक्रार मागे घेतली असल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) शहरातील सामाजिक सभागृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) २३८०१ (१६-०७-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी (जि.हिंगोली) शहरातील बहुपयोगी असणाऱ्या सामाजिक सभागृहाकडे नगरपालिका प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे सभागृहाची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कळमनुरी शहरातील हिंगोली- नांदेड राष्ट्रीय महामार्गावर संबंधित नगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तेथील सामाजिक सभागृहाची झालेली दुरवस्था दूर करून या परिसरातील नागरिकांची गैरसोय होऊ नये यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) कळमनुरी नगरपरिषद येथील सर्वे क्र.१३ व ९ ब मध्ये लामनदेव मंदिरासमोर सामाजिक सभागृहाची इमारत अंदाजे ३० वर्षापुर्वी बांधण्यात आली असून, सन २०१७ मध्ये शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली यांच्यामार्फत केलेल्या संरचनात्मक लेखापरिक्षणाच्या अहवालानुसार सदर इमारत वापरण्यायोग्य, तसेच दुरुस्ती करण्यायोग्य नाही. यामुळे सदर इमारत निष्कासित करण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर करण्यात येत आहे.

नागरिकांना सोय उपलब्ध होण्याकरीता सदर ठिकाणी केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य" या योजनेंतर्गत सांस्कृतिक भवन, वाचनालय व दुकान केंद्र उभारण्याकरीता नगरपरिषदेस दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ४,६९,२३,०००/- इतक्या रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने रितसर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सांस्कृतिक भवन, वाचनालय व दुकान केंद्र उभारण्याची कार्यवाही कळमनुरी नगरपरिषदेच्या स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेच्या मलजल प्रकल्पाच्या कामामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१७) २३९०८ (३०-०५-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या मलजल प्रकल्पाच्या उभारणीचे काम अपूर्णावस्थेत असताना आयुक्तांची मंजुरी न घेता सदर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराचे रुपये दोन कोटीच्या रकमेचे देयक अदा केल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्यानंतर मे.व्ही.ए.टेक वाबाग लि. या कंपनीला तीन वर्षांचा पालिकेने कार्यादेश देण्यात आला असतानाही मे.ग्रेडियंट इंडिया प्रा.लि. यांच्या समवेत करार करुन मे.कोपरी बायो इंजिनीयरिंग प्रा.लि. नावाने फर्म बनविण्यात आली असून याबाबत सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाबाबत कार्यादेश मे.व्ही.ए.टेक वाबाग लि. या कंपनीच्या नावे असताना मे.कोपरी बायो इंजिनीयरिंग प्रा.लि. नावाने देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी माहे सप्टेंबर, २०२२ ते माहे जुलै, २०२३ या कालावधीसाठी रुपये ८ कोटी ४४ लाख ५७ हजार ८९९ चे देयक ए.के.इलेक्ट्रिकल्समार्फत सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली केली आहे काय, त्यानुषंगाने मलजल प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराने सक्षम प्राधिकरणाची मंजुरी न घेता अन्य कंपनी सोबत करार केल्याने सदर निविदा रद्द करुन कंपनीचा समावेश काळया यादीत करुन शासनाच्या निधीमध्ये अनियमितता करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१०-२०२४) :** (१), (२), (३) व (४) ठाणे महानगरपालिकेने कोपरी येथील मलप्रक्रिया केंद्राचे सर्वसमावेशक परिचालन, निगा, देखभाल व दुरुस्ती करणे (भाग १) आणि मलप्रकिया केंद्रातील मलजलापासून विजनिर्मिती, प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करणेकामी PPP तत्त्वावर प्रकल्प (भाग २) उभारण्याबाबत निर्णय घेतला असून प्रकल्पातील भाग १ नुसार माहे सप्टेंबर, २०२२ ते जुलै २०२३ या कालावधीतील देयक रकमेपैकी रक्कम रुपये २.५३ कोटीचे देयक प्रचलित कार्यपध्दतीनुसार ठेकेदारास अदा केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी मंजूर निविदाकार मे.व्ही.ए.टेक वाबाग लि. यांनी मे.कोपरी बायो इंजिनीयरिंग प्रा.लि. नावाची SPV बनविली असून सदर प्रकरणी नगर अभियंता, ठाणे यांची मान्यता प्राप्त आहे.

सदर प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या SPV, मे.कोपरी बायो इंजिनीयरिंग प्रा.लि. यांच्या नावाने देयक सादर करण्यात आले असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांना करामध्ये सूट देण्याबाबत

**(१८) २३९२० (१६-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील मालमत्ता धारकांना मालमत्ता करामध्ये चालू आर्थिक वर्षातील पहिल्या तीन महिन्यांत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ५ ते ७ टक्के सुट देण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुट देण्याच्या महत्वपूर्ण निर्णयामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार असल्याची बाब निदर्शनास आली असून आर्थिक वर्षात पहिल्या तीन महिन्यात सुट दिली जात असल्याने मालमत्ता कर भरणा जास्तीत जास्त प्रमाणात होऊन महनगरपालिकेच्या महसुलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकसभा निवडणूकीच्या आचारसंहितेचे कारण देत प्रशासनाकडून माहे एप्रिलमध्ये कराचा भरणा करणाऱ्यांना सुट न देता पूर्ण रक्कमेची वसुली केली जात असल्याची बाब माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मार्च अखेरीस नंतर मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना महानगर पालिका प्रशासनाकडून सुट दिली जात नसल्याने मालमत्ताधारकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून सदर सुट न देण्यामागची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मालमत्ता धारकांची नाराजी दुर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०२-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

अकोला महानगरपालिका हद्दीतील मालमता धारकांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मालमत्ता कराचे मागणी देयके वितरीत केल्यानंतर ज्या मालमत्ता धारकांनी ३० दिवसाचे कालावधीच्या आत चालु आर्थिक वर्षाचा संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा केला अशा मालमत्ता धारकांना सामान्य कराच्या रक्कमेत ७%, ज्या मालमत्ता धारकांनी ६० दिवसाचे आत मालमत्ता कराचा भरणा केला त्यांना ६% आणि ज्या मालमत्ता धारकांनी ९० दिवसाचे आत भरणा केला त्यांना ५% सामान्य कराच्या रक्कमेत सुट देण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

अकोला महानगरपालिकेतर्फे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचे मागणी देयक वितरित केल्यानंतर सामान्य कराच्या रकमेत दरवर्षीप्रमाणे सूट देण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील एमआयडीसीमध्ये महानगरपालिकेकडून घंटागाडी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) २४१०२ (१६-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील एमआयडीसीमध्ये घंटागाडी वेळेवर येत नसल्यामुळे परिसरात कचऱ्याचे ढिग साचले असल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोसरी एमआयडीसी परिसरात लघुसूक्ष्म मध्यम अशा स्वरूपाच्या सहा ते सात हजार कंपन्या असून हजारो कोटींचा महसूल या कंपन्यांमार्फत महानगरपालिकेला दिला जातो परंतु, त्या बदल्यात

कंपन्यांना कोणत्याही मूलभूत सुविधा पुरवल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंपन्यात निर्माण होणारा कचरा साठून राहिल्यामुळे कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न तसेच साथीचे आजार वाढण्याची शक्यता या परिसरात निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिंपरी चिंचवड शहरातील एमआयडीसी परिसरात घंटागाडी वेळेवर येण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी या उद्योजकाकडून होत असतानाही त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील एमआयडीसी परिसरात घंटागाडी वेळेवर उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच कचऱ्याचे विघटन करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात एमआयडीसीमधील दैनंदिन अघातक कचरा गोळा करुन त्याची वाहतूक करणेसाठी वाहने उपलब्ध करुन दिलेली आहेत.
(५) एमआयडीसी परिसरातील दैनंदिन अघातक कचरा गोळा करणे व त्याची वाहतूक करण्यासाठी ९ टाटा एस घंटागाडी, ८ ट्रक, १ हायवा, १ हुक लोडर कॅप्सुल, १ कॉम्पॅक्टर इत्यादी वाहने कार्यरत असून त्यांचेमार्फत दररोज अंदाजे ४५-५० मे. टन सुका कचरा वाहतूक केला जातो.
औद्योगिक आस्थापनांना त्यांचेमार्फत उत्पन्न होणारा घातक कचरा हा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याने सदर घातक कचरा संबंधित कंपनीमार्फत रांजणगाव येथे विल्हेवाट लावणेकरीता पाठविणे आवश्यक आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेतील अ व ब वर्ग च्या रिक्त पदांबाबत

**(२०) २४२२२ (१६-०७-२०२४) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिके अंतर्गत "अ" व "ब" गट/वर्ग ची ५४ पदे मंजूर असून मंजूर पदांपैकी "अ" व "ब" गट / वर्ग ची ३९ पदे रिक्त असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास महानगरपालिके मधील "अ" व "ब" वर्ग / गटाच्या रिक्त पदांमुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे प्रलंबित राहून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच कार्यरत अधिकारी वर्गावर अतिरिक्त कामांचा ताण येऊन याचा परिणाम कामावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला महानगरपालिकेतील "अ" व "ब" वर्ग / गटाची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाचे कारण काय ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०२-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

अकोला महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये गट अ व ब ची ५४ पदे मंजूर असून सद्य:स्थितीत ४३ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही, महानगरपालिकेतील कामाचे योग्य नियोजन करुन कार्यरत अधिकारी यांचेकडे रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपवुन कामे करण्यात येत आहेत.

(३) शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ अन्वये अकोला महानगरपालिकेच्या आकृतीबंधास व शासन निर्णय दिनांक २० जून, २०२४ अन्वये अकोला महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२४ ला मान्यता देण्यात आली आहे. पदभरतीबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.